**कविता**

# साहिल शेख

१
मोर्च्यातील तुटक्या चपलांनी हाणून घ्यावं
किंवा
बदडून काढावं असंवेदनशील व्यवस्थेला
किंवा
भेगाळलेल्या पायाच्या तळव्यात शोधावी कवितेची लालसर ओळ.
पुतळा परदेशी म्हणून ओरडणाऱ्याचा घसा लावावा तूसाद म्युझिअममध्ये,
किंवा
पेरावीत उजेडझाडे अमन-सुकून देणारी, करपलेल्या काळजात,
साजरा करावा लिपस्टिकी विमेन्स डे ओठांना लावून रक्तरंग
फेरीवाल्याबाईशी बोलावं वडापाव खात तिच्या पोटच्या पोरांवाणी !
सलग झडू द्याव्या, आई उदो-उदोच्या क्लासिकल मैफिली
जॉइन हैशटॅगच्या जगात व्हावं सेल्फिसकट सेलेब्रिटी
पालथी घालावी मुंबई-गोवंडी-धारावी
किंवा
हॉकर्स युनियनमधून सांगावी साऊमाय, साळवे किंवा एखादी फातिमा, जिजाऊ रमाई सकट
किंवा
पाय दाबावेत घरी जाऊन आई-बायकोचे
फिरवावा डोक्यावरून हात छोट्या मुलीच्या
पद्मावती वगैरेच्या उथळ गप्पांतून उठून आणून द्यावीत वयात आलेल्या बहिणीला सैनिटरी पॅड,
आणि
वाजवावा डंका प्रोग्रेसिव्हतेचा मोडीत निघालेल्या प्राथमिक शाळेतल्या मास्तरीणबाई समोर
किंवा, किंवा
काही कळत नाही म्हणून पुन्हा पुस्तकातून पिळून काढावा पू
कागद फाडून करावा पुष्पकविमान आपण आपल्यासाठीच
आणि
उरावे तुकोबा किंवा स्टीफनसारखे, किमान त्याच वाटेवर रुजण्याचा प्रयत्न करावा पिंपळ होऊन।।

# यांच्या पाच कविता

२
नेमक्या अजानच्या वेळेलाच
ढोल, ताशा, झांज, डीजेचा वाढतो आवाज
मस्जिदीसमोर
आतले एकेश्वरत्व विचलित होते.
बाहेर जल्लोष असतो, रिमिक्स कानठळ्या
बसल्यागत,
कधीतरीच नमाजला जाणारा माझा भाऊ
डोक्यावरची टोपी सावरत चिडल्यासारखा मूठ
आवळतो
तिकडून रफ्याची गँग येते बाहेर
संयमाची शिकवण घेऊन
हाफिजी पान खात, दात-ओठ रंगवतात
मिरवणूक उधळीत जाते; नकळत की जाणून बुजून
उत्सवी रंग रस्त्यावरून
हिरव्या भिंतीवर खूण बाकी ठेवत बहुतेक!
मोहल्ल्यातल्या कट्ट्यावर जमतात,
बाजार आवरून आलेली हमाल पोरं
बुरख्यातल्या आयाबाया आतल्याआत झगडत, वजू
करत सार्वजनिक हापश्यावर
माझा मुलगा कबीर म्हणत असतो एकच ओळ
जय हे.. जय हे.. जय हे.., आपल्या बोबड्या
बोलात
सावधान राहून मी गप्प वाचीत असतो इकबाल,
सोपा वामनदादा
पचेल तेवढा नामा-ढसाळ,
स्वातंत्र्य कोंच्या गाढवीनीचं नाव हाय
किंवा तुजी यत्ता कंची?

३
दिमाखात साजरा होतोय
हरेक सण
आम्हीच कसे सहिष्णू
दाखवताहेत सारेचजण
शुभेच्छाचा पाऊस मुसळधार
फील गुड करतोय मुसलमान
पण
शाहिद आजमीच्या लढ्याला मुबारक बात द्यायची
राहिलीय.
नजीबचा शोध थांबवायचा का?
सय्यद अमीनबद्दल बोलत नाहीत
कुणीच कसे-उजवे डावे फसवे
विवेकाच्या बाजूने लढणारेच होते ना हे सर्व
सफदर हाश्मीबद्दल बोलू की नको?
गोळीच होती ना ती!
विचार मरत नाहीत, हे रटाळगाणं आणखी किती
दिवस?
डफावर ओरडून अमर शेख अदृश्य केले गेलेत
कबरीवर त्यांच्या इमारतीचे ओझे भांडवली
असो
गौरी लंकेशचा सापडलाय खुनी,
कलबुर्गींना मारणारेही सेम तेच सारे
पानसरेंच्या खून्यासारखंच त्यांनाही मिळेल
हिंदुत्वस्थान्याकडून बक्षीस
सोडला जाईल सरळ बेलवर
आवड तुला बेलाची।।
आपण गुणगुणत राहू भोळ्या सांबाचे गीत
टिपूला मर्यादित ठेवू
किंवा मुन्शीबेग
सरहद्द गाधींचे गाठोडे गुंडाळू,
चित्रकार मीरचे पेंटिग्ज मिरवू व्याख्यानातून
आणि
मोहसिनच्या मारेकऱ्याचा व्हिडिओ पाहू संयमाने

४
येत नाही दर्ग्यातून सुफीसुगंध दरवळत मंद
येत नाही मस्जिदीतून अजान सुकूनमय
किंवा
सळसळत नाहीय पिंपळकट्ट्यावरचा बुद्ध,
अत्त दीपचा उजेड नाही समजला
अजून माझ्या गावाला,
नाही येत चर्चबेलची भव्य शांतता
समाधान देणारी,
जुन्या देवळांतल्या घंटा भयभीत करताहेत
संगमावरच्या नदीचा प्रवाह नाही देत
नाद संगीत
ओल धरलेल्या मातीतून फुटत नाही पालवी
पक्ष्यांच्या घरट्याची कलाकुसर कुजून
पडलीय रानभर,
वारा गात नाही कसलंच गाणे
गावात उरली आहेत फक्त जनावरे
बाजारू संवेदनाचे घाऊक गिऱ्हाईक
मानवतेच्या वाळवंटात
शब्दांचा फाळ
की
साहित्याचा नांगर
कविता काय घंटा लिहू
माणूस नष्ट होतोय माझ्या गावात!

५
नूतन वर्षाच्या अस्वस्थ नोंदी
फॅसिझमची गोंधळलेली नांदी
निमित्त उना, सहारनपूर, रोहित, नजीब, पहलू,
अखलाक
हजयात्रा, नोटबंदी, जीएसटी, आधार, हलाला
मंदिर-मस्जिद-तलाक
शुभेच्छांच्या भाऊगर्दीत मंगलदंगल कोरेगाव
तोच तोच पुन्हा पुन्हा सवयीचा
सनातनी डाव
नागवा हिटलर-स्टॅलिन, उद्ध्वस्त माणुसकीचे गाव
जज मीडिया कौतुक टीका हीच
लोकशाही का राव?
कॉन्स्पिरंसी पेरणी व्यवस्थित उजवे डावे
पिचलेल्या भारतीयाने लढावे की
रडावे?

**साहिल शेख**
कुरुंदवाड, जि. कोल्हापूर
sahilspeededucation@gmail.com